सं.फौ.ख.क्र.८६८/२०२०
सरकार वि.सुनिल
नि.क्र.१२ च्या खाली

साक्षीदार क्र **०२** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–मंदाबाई नारायणरावजी बिरे
वय ४८ वर्ष, व्यवसाय–शिवणकाम
राह.मेडिकल चौक,नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. घटना दि.०६/१०/२०२० रोजी दुपारी ०१.०० वाजेची आहे. सदर दिवशी मी माझ्या घरी अंगणात बसुन असतांना आरोपी सुनिल बिरे हा दारू पिउन आला आणि मला जुन्या भांडणाच्या कारणावरून माझ्याविरूध्द रिपोर्ट का दिली या कारणावरून भांडण केले व तु माझ्या नजरेच्या दुर हो, तु येथुन चालली जा, तु दिसली की माझा दिवस खराब जातो, तु येथुन चालली जा नाही तर तुला जिवाने मारून टाकीन, रिपोर्ट देउन माझे काय बिघडवले, एक दिवस मी तुझ्या पुदीचे कातडे काढीन, रांड, रांडकाड, नाचनेवाली वेश्या असे म्हणुन शिविगाळ केली. त्यानंतर मी पो.स्टे. ला रिपोर्ट दिली. त्यानंतर मी माझ्या मुलाकडे नागपुर येथे गेली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती आहे फिर्यादला **निशाणी क्र.२०** देण्यात आला. आता मला प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती आहे त्याला **निशाणी क्र.२१** देण्यात आला. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते. ज्या आरोपीने मला शिविगाळ केली त्या आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो. आरोपीकडे बोट करून साक्षीदार सांगते की, मला शिविगाळ करणारा आरोपी तोच आहे व तो आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड. एन.के.सुभेदार यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>**

२. आरोपी सुनिल विठ्ठलरावजी बिरे हा माझा सख्खा पुतण्या आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर घटनेच्या पुर्वीपासुनच आरोपीच्या आईवडीलांसोबत माझे बोलणे–चालणे बंद आहे. आरोपीचे घर व माझे घर सोनेगाव लोधी येथे एकमेकाला लागुन आहे व आमच्या घराला लागून ब–याच लोकांची घरे आहेत. मी आरोपीविरूध्द फिर्याद तोंडी दिली होती. आरोपी हा दारू पिउन आला ही बाब मी पोलिसांना फिर्याद देतांना सांगितली होती. आता मला फिर्याद व बयाण दाखविण्यात आली त्यामध्ये सदर बाब नमुद नाही ती का नमुद नाही

याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला वरिल तु माझ्या नजरेच्या दुर हो, तु येथुन चालली जा, तु दिसली की माझा दिवस खराब जातो, तु येथुन चालली जा नाही तर तुला जिवाने मारून टाकीन, रिपोर्ट देउन माझे काय बिघडवले, एक दिवस मी तुझ्या पुदीचे कातडे काढीन, रांड, रांडकाड, नाचनेवाली वेश्या अश्लील भाषेत शिवीगाळ केली हे मी खोटे सांगत आहे. सोनेगाव येथून बेला येथे दुचाकी वाहणाने जाण्यासाठी २० मिनिट लागतात. माझ्याकडे दोनचाकी वाहण आहे.

**प्रश्न–**तुम्ही घटनेच्या दिवशीच तक्रार दिली होती काय?

**उत्तर–**घटनेच्या दिवशीच तक्रार दिली होती किंवा कसे हे मला आठवत नाही.

मी ३.०० किंवा ४.०० वाजता दिवसा तक्रार दिली असेल. मला हे निश्चित आठवत नाही की, तक्रार ही मी घटनेच्या दिवशी दिली कि दुस–या दिवशी दिली. हे म्हणणे खरे नाही की, मला माझ्या फिर्यादमधील व बयाणामधील मजकूर काय लिहीला आहे हे माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की,आरोपीच्या आईवडीलांसोबत माझे पटत नसल्यामुळे मी आरोपीविरूध्द खोटी केस दाखल केली आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगते की, आरोपी हा त्याच्या आईवडीलांच्या जागेवर उभा राहून माझ्यासोबत भांडण करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.०९.०६.२०२५

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड